पोलीस अधीक्षक, पालघर यांचे कार्यालय
मध्यवर्ती प्रशासकीय इमारत संकुल, मोरेकुरण रोड, पालघर, बोईसर, रोड,
कोळगांव (प.) जिल्हा – पालघर. दुरध्वनी – ०२५२५-२५११००
E-mail sp.palghar@mahapolice.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा. क्र. पोअपा/आस्था-१/चालक पो. शि./ कागदपत्र पडताळणी उपस्थित/१२८ /२०२३, दि :- १७ /०४/२०२३

# पोलीस अधीक्षक, पालघर चालक पोलीस शिपाई भरती-२०२१

## तात्पुरती निवड यादीतील उमेदवारांचे मुळ कागदपत्र पडताळणी करीता उपस्थिती रहाणेबाबत उमेदवारांसाठी सुचना

दिनांक १७/०४/२०२३

---००---

पालघर जिल्हा पोलीस दलाचे आस्थापनेवर चालक पोलीस शिपाई संवर्गातील ०५ रिक्त पदांकरीता आयोजित केलेल्या चालक पोलीस शिपाई भरती -२०२१ ची मैदानी चाचणी व लेखी परीक्षा गुणांच्या आधारे गुणवत्ता यादी तयार करुन, उमेदवारांना मैदानी चाचणी व लेखी परीक्षेत मिळालेल्या गुणानुसार तात्पुरती निवड यादी (PROVISIONAL SELECTION LIST) व तात्पुरती प्रतिक्षा यादी (PROVISIONAL WAITING LIST) यादी उमेदवारांच्या माहिती करीता www.mahapolice.gov.in तसेच www.palgharpolice.gov.in या संकेतस्थळावर दि.११/०४/२०२३ रोजी प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

२. प्रसिध्द करण्यांत आलेल्या तात्पुरत्या निवड यादीतील उमेदवारांनी खालील नमुद तारखेस मुळ कागदपत्राच्या पडताळणीसाठी पोलीस अधीक्षक कार्यालय, पालघर या ठिकाणी उपस्थितीत रहावे.

| अ.क्र. | उमेदवारांचा तपशिल | मुळ कादपत्र पडताळणीची तारीख व वेळ |
|---|---|---|
| १. | तात्पुरत्या निवड यादीमधील उमेदवार | १९.०४.२०२३ रोजी सकाळी १०.०० वाजता. |

३. उमेदवारांने मुळ कागदपत्र पडताळणीस उपस्थित राहताना लेखी परीक्षेच्या वेळी ऑनलाईन काढलेले ओळखपत्र व त्यांचे आवेदन अर्जात नमूद केलेल्या खालील कागदपत्र/प्रमाणपत्र ची मुळ प्रत, त्यांच्या छायांकित प्रतीचे दोन संच व ०२ पासपोर्ट फोटोसह न चुकता उपस्थित रहावे.

- शैक्षणिक अर्हता प्रमाणपत्र
- जन्म तारखेबाबतचे प्रमाणपत्र ( जन्म दाखला/शळा सोडल्याचा दाखला/बोनाफाईड)
- जात प्रमाणपत्र, जातवैधता प्रमाणपत्र (असल्यास)
- समांतर आरक्षणाचे प्रमाणपत्र
- नॉन किमिलेअर प्रमाणपत्र

* अधिवास प्रमाणपत्र (Domicile Certificate)
* संगणक अर्हता प्रमाणपत्र
* वाहन चालविण्याचा परवाना

४. कागदपत्र पडताळणीस उमेदवार गैरहजर रहिल्यास त्यांचे नाव तात्पुरत्या निवड/प्रतिक्षा यादीतुन वगळण्यात येईल.कागदपत्र पडताळणी पुर्ण झाल्यानंतर कागदपत्र पडताळणीमध्ये पात्र ठरलेल्या उमेदवारांची अंतिम निवड यादी शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार प्रसिध्द करण्यात येईल यांची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

५. तात्पुरत्या निवड यादी (PROVISIONAL SELECTION LIST) मधील निवड ही भरती निकष पुर्ततेच्या अधीन असुन त्यामध्ये अपात्र झाल्यास तात्पुरत्या निवड यादीमधील उमेदवारांचे नाव रद्द करण्यांत येईल. याबाबत उमेदवारांचा कोणताही दावा /तक्रार/हक्क राहणार नाही याची नोंद घ्यावी.

६. पोलीस भरती प्रक्रिये दरम्यान नियमानुसार आवश्यक ते बदल/निर्णय घेण्याचे अधिकार पोलीस भरती निवड मंडळाकडे राखुन ठेवण्यात आलेले आहेत यांची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

**(बाळासाहेब पाटील )**
**अध्यक्ष**
**पोलीस भरती निवड मंडळ तथा**
**पोलीस अधीक्षक,पालघर**